रे.दि.मु.नं. ४६/२०१९

## निशाणी ०५ खालील आदेश

( श्रीमंत मोहिते विरुध्द सोमनाथ पवार )

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादीविरुध्द दाखल केलेला असुन त्यायोगे दावेचा अंतिम निर्णय होईपावेतो प्रतिवादी यांनी स्वतः अगर अन्य इसमांमार्फत दावा मिळकतीमधील कोणत्याही प्रकारचा रस्ता करु नये व वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश होणेकरिता विनंती केलेली आहे.

२. वादीचे अर्जातील थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे –

मौजे–शिवणी, ता. कडेगांव, जि.सांगली येथील गट नं. ९७५ क्षेत्र ० हे. ३४ आर. ही संपूर्ण मिळकत (सदर मिळकतीस संक्षिप्तपणे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात आलेले आहे.) ही मिळकत वादीचे मालकी वहिवाटीची मिळकत असून या मिळकतीच्या दक्षिणेस प्रतिवादी यांची गट नं. ९८८ व ९८४ या मिळकती आहेत. दावा मिळकतीमधून प्रतिवादीचे मिळकतीला जाणे–येणेकरीता केंव्हाही व कधीही रस्त्याची वहिवाट नव्हती व नाही. तथापी, 'प्रतिवादी यांनी गट नं. ९८८ मधील ऊस पीक बाहेर काढणेसाठी वाद मिळकतीमधून वहिवाटीच्या रस्त्यात वादीने रस्त्याचे क्षेत्र नांगरुन पुर्वंपार वहिवाटीच्या रस्त्यास हकरत व अडथळा केला' असे खोटे कथन करुन तहसिलदार, कडेगांव यांचे न्यायालयात रस्ता केस/एस.आर./३४/२०१८ हा वादीचे दावा मिळकतीमधून रस्ता मिळावा म्हणुन रस्ता मागणी अर्ज केलेला आहे.

वादी पुढे असे कथन करतात की, तहसिलदार, कडेगांव यांनी सदर रस्ता केस कामी अधिकार कक्षेबाहेर जावून दि. १४/०१/२०१९ रोजी निर्णय दिलेला आहे. याच निर्णयाच्या आधारे प्रतिवादी हे वाद मिळकतीमधून रस्ता करणेचे तयारीत असून वादीचे मालकी वहिवाटीस हरकत व अडथळा करत असलेमुळे, वादीने तहसिलदार, कडेगांव यांनी रस्ता केस कामी दिलेला निर्णय हा अवैध आहे असे जाहीर होवून मिळेणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दावा दाखल केलेला आहे व त्या अनुषंगे तुर्तातुर्त मनाई अर्ज सादर केलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी २६ लगत सदर अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे.

प्रतिवादीचे मते, तहसिलदार, कडेगांव यांनी रस्ता केस/एस.आर./३४/२०१८

याकामी दिलेला न्यायनिर्णय हा मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ नुसार दिलेला असून, या न्यायनिर्णयाविरुध्द वादीस सदर दावा दाखल करणेचा हक्क येत नसलेमुळे वादीचा दावा व तदअनुषंगे दाखल असणारा मनाई अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी हे गट नं. ९८४ व ९८८ मधील असणारे ऊसाचे पीक हे वाद मिळकतीमधील सर बांधावरुन पुर्वापार वहिवाटीच्या असणा–या रस्त्यानेच नेत होते. सन २०१८ साली गट नं. ९७५ मधील पुर्वापार वहिवाटीचा रस्ता वादीने चर मारुन स–या पाडून ऊसाची लागण करुन बंद केला. त्यामुळे प्रतिवादीने तहसिलदार, कडेगांव यांचेकडे सर बांधावरुन पुर्वापार वहिवाटीच्या रस्त्यामध्ये केलेला अडथळा दुर होवून मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला होता. त्याप्रमाणे तहसिलदार, कडेगांव यांनी स्थळ पाहणी करुन पंचनामा केला व त्याप्रमाणे न्यायनिर्णय दिलेला आहे.

प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, गट नं. ९७५, ९८९, ९८८, ९८७ व ९९४ हे मिळकतीधारक तहसिलदार, कडेगांव यांनी पंचनामेमध्ये नमुद कलेल्या दक्षिणोत्तर चालीच्या पुर्वापार वहिवाटीच्या सरबांधावरील रस्त्याचा वापर करत होते व आहेत. या रस्त्या खेरीज त्यांस अन्य कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नव्हता व नाही. आजमितीस प्रतिवादी यांचे गट नं. ९८८ व ९८४ या मिळकतीमध्ये गाळपास योग्य असे ऊस पीक असून ते पीक कारखान्यास गाळपाकरीता पाठविणे आवश्यक आहे. सदर ऊस पीक कारखान्यास गाळपाकरीता न पाठविलेस प्रतिवादीचे अतोनात नुकसान होणार आहे असे कथन करुन प्रतिवादीने त्याचा ऊस नेतेवेळी वादीचे गट नं. ९७५ मधून ऊस पीकाचे नुकसान झालेस प्रतिवादी हे नुकसान भरपाई देणेस तयार आहेत असे नमुद केलेले आहे व वादीचा अर्ज नामंजुर करणेबाबत विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजुंचे विधिज्ञांचा युक्तीवाद विचारात घेता, माझेसमक्ष पुढील मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित पुढीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादीला प्रथमदर्शनी संयुक्तिक बाजु असल्याची बाब सिध्द झालेली आहे का ? | होकारार्थी |
| २. न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे का ? | होकारार्थी |
| ३. सदरचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |

| | |
|---|---|
| ४. आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

५. वादी व प्रतिवादीची कथने विचारात घेता, वादीचे गट नं. ९७५ या मिळकतीचे दक्षिणेस प्रतिवादी यांची गट नं. ९८८ व ९८४ ही मिळकत आहे. याबाबत दोन्ही पक्षामध्ये एकवाक्यता दिसून येते. तसेच, तहसिलदार, कडेगांव यांनी रस्ता केस/एस.आर./३४/२०१८ याकामी न्यायानिर्णय केलेचे देखील दोन्ही पक्ष मान्य व कबूल करीत आहेत.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता</u> –**

६. मुद्दा क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी सलग्न व निगडीत असलेमुळे त्यांची कारणमिमांसा एकत्रीतरित्या नोंदवत आहे.

७. प्रस्तुतकामी प्रतिवादी यांनी तहसिलदार कडेगांव यांनी रस्ता केस नं. ३४/२०१८ कामी पारीत केलेला न्यायानर्णिय हा मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये पारीत केलेला असलेमुळे कलम ५ मधील तरतुदी अन्वये दाखल असणारा अर्ज हा दिवाणी दावा समजणेत येत असलेमुळे वादीचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज या न्यायालयात चालणेस पात्र नाही असा आक्षेप नोंदवलेला आहे.

प्रस्तुतकामी वादीतर्फे *Mohammad Khan v/s Shri Shankar s/o Maroti Dhage & Anr 2017 (3) All MR 380* न्यायनिर्णय हजर केलेला असून, त्याचे अवलोकन केले असता, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ नुसार दिलेल्या न्यायनिर्णयाबाबत दिवाणी न्यायालयात दाद मागणेचा हक्क आहे असे स्पष्ट केलेले आहे. सबब, प्रतिवादीने नोंदविलेल्या आक्षेपामध्ये तथ्य आढळुन येत नाही.

८. प्रस्तुतकामी प्रतिवादीने गट नं. ९७५ या वादीच्या मिळकतीच्या सरबांधावरुन पुर्वापार वहिवाटीचा रस्ता आहे व त्याचा वापर गट नं. ९७५, ९८९, ९८८, ९८७ व ९८४ मधील धारक करत असतात व त्याबाबतचा उल्लेख तहसिलदार, कडेगांव यांनी केलेल्या पंचनामेमध्ये नमुद असलेचे कथन केलेले आहे. प्रस्तुतकामी वादीतर्फे ३/२ लगत तहसिलदार, कडेगांव यांनी रस्ता केस कामी केलेल्या पंचनामेची साक्षंकित प्रत हजर केलेली आहे. तिचे अवलोकन केले असता, 'गट नं. ९८८, ९८९, ९६२ व ९८४ सदर

गटामध्ये सरबांधावरुन रस्ता दिसून येतो. तथापी, गट नं. ९७५ व ९८९ मध्ये जाणेसाठी रस्ता दिसून येत नाही' असे नमुद केलेले आहे.

प्रस्तुतकामी प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी वाद मिळकतीमध्ये पुर्वांपार वहिवाटीचा रस्ता आहे असे कथन केलेले आहे. तसेच, त्यांचे मते, सरबांधावरुन वहिवाट करणेचा हक्क हा त्यांचा पारंपारीक सुविधाअधिकार (Customary right of Easement) आहे. प्रतिवादीने गट नं. ९७५ या मिळकतीचे सरबांधावरुन सदरचा पारंपारीक सुविधाअधिकाराचा हक्क बजावणेकरीता रस्ता आहे हे दाखविणेकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. याउलट त्यांनी तहसिलदार, कडेगांव यांचेकडे रस्ता केस कामी सादर केलेले दि. ०३/१२/२०१८ रोजीचे लेखी म्हणणे (नि.३/४) विचारात घेता, म्हणणे दाखल करतेवेळी गट नं. ९७५ या मिळकतीमधील क्षेत्र नांगरुन वादीने ऊसाच्या पीकाची लागण केलेली आहे असे कथन केलेले आहे. तसेच, प्रतिवादीने नि. २६ लगत दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये देखील गट नं. ९७५ या मिळकतीमध्ये असणारे ऊस पीकाचे प्रतिवादीचा ऊस नेतेवेळी नुकसान झालेस प्रतिवादी नुकसान भरपाई देणेस तयार आहेत असे कथन केलेले आहे. याचाच अर्थ डिसेंबर–२०१८ ते आजतागायत गट नं. ९७५ या मिळकतीचे सरबांधावरुन रस्ता अस्तित्वात असलेचे दिसून येत नाही. पारंपारीक सुविधाअधिकाराचा हक्क बजावणेकरीता प्रतिवादीने सदर वहिवाटीचा हक्क तो निरंतरपणे उपभोगत आहे हे दर्शवून देणे जरुरीचे आहे. तसेच, सुविधा अधिकार कायदा कलम १५ नुसार पुर्वांपार रस्ता वहिवाटीचा सुविधा आधिकार बजावणेकरीता प्रतिवादी हा तो हक्क निरंतरपणे २० वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता उपभोगत आहे हे दाखविणे जरुरीचे आहे. प्रस्तुतकामी प्रतिवादीने त्याचे कथनानुसार त्यांस असणारा सुविधाअधिकाराचा हक्क निरंतरपणे उपभोगला आहे हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

याउलट वादीने नि. २९/१ लगत गट नं. ९८४ या मिळकतीमधील प्रतिवादीने खरेदी केलेल्या क्षेत्राचे खरेदीपत्राची साक्षंकित प्रत हजर केलेली आहे. प्रतिवादीचे मते, गट नं. ९८४ चे पूर्वबाजूचे सरबांधावरुन पुर्वांपार वहिवाटीचा रस्ता अस्तित्वात आहे. तथापी, सदर खरेदीपत्रातील चतुःसिमा विचारात घेता, प्रतिवादीने गट नं. ९८४ या मिळकतीमधील पूर्व बाजुचे क्षेत्र खरेदी केले असुन, खरेदी केलेल्या क्षेत्राच्या पूर्वेस काकासो महिपती पवार यांची वेगळे गटाची विहीर पड जमिन असलेचा उल्लेख दिसून येतो. तसेच, सदरचे खरेदीपत्र हे दि. ०४/०२/२०११ रोजी नोंदवलेले आहे. याचाच अर्थ दि. ०४/०२/२०११ रोजी गट नं. ९८४ चे पूर्वबाजूचे सरबांधावरुन पुर्वांपार वहिवाटीचा रस्ता अस्तित्वात नव्हता असे प्रथमदर्शनी दिसून येते.

सदरचे खरेदीपत्र हे बबन नारायण महाडीक यांनी प्रतिवादीस लिहून दिलेले आहे. प्रस्तुतकामी वादीने नि. २७ लगत बबन नारायण महाडीक यांचे वारस अभिजीत बबन महाडीक यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे, त्यातील मजकुर विचारात घेता, प्रस्तुत साक्षीदाराने गट नं. ९८४ या मिळकतीस येणे–जाणे करीता गट नं. ९७५ मधून केंव्हाही पुर्वांपार वहिवाटीचा रस्ता नव्हता व नाही. तसेच, त्यांनी कधीही गट नं. ९७५ मधून वहिवाट केलेली नव्हती व नाही व त्यांनी गट नं. ९८४ चे दक्षिणबाजूने असणा–या रस्त्याने वहिवाट केलेली आहे असा मजकुर नमुद केलेला आहे. यावरुन गट नं ९८८ व ९८४ या मिळकतीमधील ऊस पीक गाळपास नेणेकरीता वादीच्या गट नं. ९७५ या मिळकतीच्या सरबांधावरुन असलेल्या रस्त्याखेरीज प्रतीवादीस अन्य कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नाही या प्रतिवादीच्या कथनामध्ये तथ्य दिसून येत नाही.

९. प्रस्तुतकामी वादीने तहसिलदार, कडेगांव रस्ता केस/एस.आर./३४/२०१८ याकामी पारीत केलला न्यायनिर्णय हा त्यांचे अधिकार कक्षेबाहेर दिलेला न्यायनिर्णय आहे असे कथन केलेले आहे. वादीने सदर दावेचेकामी नि. ३/१ लगत प्रतिवादीने तहसिलदार, कडेगांव यांचेकडे रस्ताकामी प्रतिवादीने दाखल केलेल्या मुळ अर्जाची साक्षंकित प्रत हजर केलेली आहे. तीचे अवलोकन केले असता, प्रतिवादीने सदरचा अर्ज हा कलम १४३ अंतर्गत रस्ता अडवणूक संदर्भात दंडात्मक कार्यवाही करणेबाबत असा मजकुर नमुद करुन दाखल केलेला आहे व सदर अर्जामध्ये वादीने रस्तामध्ये केलेली अडवणूक दुर होवून मिळावी व त्यांचेवर अडवणुक केलेबाबत दंडात्मक कारवाई करणेत यावी अशी विनंती केलेली आहे.

१०. नि. ३/३ लगत प्रतिवादीने रस्ता केस कामी दाखल केलेल्या दावा दुरुस्ती करणेबाबत दिलेल्या अर्जाची साक्षंकित प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता, मुळ अर्जाचे कामी नजरचुकीने कलम १४३ असे नमुद झालेले आहे, त्या ऐवजी मामलेदार ॲक्ट १९०६, कलम ५ असे नमुद करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली दिसून येते. वादीतर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवादादरम्यान कोणताही रस्ता अस्तित्वात नसलेमुळे मुळ अर्जामध्ये कलम १४३ चा उल्लेख केलेला आहे असे कथन केले. प्रतिवादी यांनी तहसिलदार, कडेगांव यांनी रस्ता केसकामी दाखल केलेला मुळ अर्जावर त्याचे वकीलांची सही असलेचे दिसून येत नाही. याउलट दावा दुरुस्ती अर्जावर प्रतिवादीतर्फे वकील यांनी सही केलेचे दिसून येते. प्रतिवादी हा शेतकरी कुटूंबातील सदस्य आहे, ही बाब आक्षेपार्ह नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी यांस कायदयातील कलमासह तरतुदी माहित असणे

अपेक्षीत नाही. तथापी, मुळ अर्जातील मजकुर हा प्रतिवादीस मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये दाद मागणेची आहे हे स्पष्ट करत आहे.

११. प्रस्तुतकामी तहसिलदार, कडेगांव यांनी प्रतिवादीतर्फे दाखल करणेत आलेल्या दावा दुरुस्ती करणेबाबत दिलेल्या अर्जावर कोणताही आदेश केलेला दिसून येत नाही. सदरकामी वादीने नि. ७ लगत तहसिलदार, कडेगांव यांनी रस्ता केस नं. ३४/२०१८ याकामी पारीत केलेला न्यायनिर्णयाची साक्षंकित प्रत हजर केलेली आहे. तिचे अवलोकन केले असता, तहसिलदार, कडेगांव यांनी 'दाव्याची पार्श्वभुमी' व 'अर्जदार यांचे म्हणणे' या मथळयाखाली प्रतिवादी यांचे दावा दुरुस्ती अर्जातील मजकुर टंकलिखीत केलेला आहे. तथापी, प्रतिवादी यांचे मुळ अर्जातील मजकुर नमुद केलेला नाही. यावरुन तहसिलदार, कडेगांव यांनी नेमका मुळ अर्ज निर्णयीत केला की, प्रतिवादीतर्फे देणेत आलेला दावा दुरुस्ती अर्ज निर्णयीत केला हे स्पष्ट होत नाही.

तसेच, तहसिलदार, कडेगांव यांनी 'वादी यांचा दावा मान्य करणेत येत आहे' असा आदेश पारीत केलेला आहे. परंतु, प्रतिवादीने मागणी केलेली दाद कशाप्रकारे मंजुर करणेत आलेली आहे व सदर आदेशाची अंमलबजावणी कशाप्रकारे करणेची आहे याबाबत कोणतेही स्पष्ट निर्देश दिसून येत नाहीत. तहसिलदार, कडेगांव यांनी स्थळ पाहणीवेळी गट नं. ९७५ या मिळकतीमध्ये ऊस पीकाची लागण केलेली आहे ही बाब पंचनामेमध्ये नमुद केलेली आहे. तथापी, न्यायनिर्णयामध्ये तहसिलदार, कडेगांव मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम २१ मधील तरतुदीनुसार गट नं. ९७५ या मिळकतीमधील उभ्या असलेल्या ऊस पीकाबात कोणताही आदेश पारीत केलेचे दिसून येत नाही. याचाच अर्थ तहसिलदार, कडेगांव यांनी रस्ता केसकामी पारीत केलेला आदेश हा अस्पष्ट, मोघम व असंदिग्ध स्वरुपाचा असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येते. यावरुन वादीस दावेचेकामी संयुक्त बाजू असलेची बाब निदर्शनास येत आहे.

१२. प्रस्तुतकामी प्रतिवादीने गट नं. ९७५ या मिळकतीचे सरबांधावरुन पुर्वपांर वहिवाटीचा रस्ता होता व आहे हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. याउलट त्यांनी दाखल केलेल्या म्हणणे विचारात घेता, प्रतिवादीचा ऊस नेतेवेळी दावा मिळकतीमधील वादीचे ऊस पिकाचे नुकसान होणेची शक्यता प्रतिवादीने वर्तविलेली असलेचे दिसून येते. सबब, सदरचा तुर्तातुर्त मनाई मंजुर न झालेस वादीचेच अपरीमित नुकसान होणार आहे हे स्पष्ट होते. तसेच, प्रतिवादीस त्याचे क्षेत्रातील ऊस नेणेकरीता अन्य पर्यायी रस्ता उपलब्ध असलेने न्यायाचा समतोल हा वादीचेच बाजूने असलेचेदेखील दिसून

येत आहे.

**१३.** सबब, वरील सर्व कारणमिमांसा विचारात घेता, मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवते.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करिता</u> –**

**१४.** मुद्दा क्रमांक ४ करिता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. दावेचे अंतिम निर्णयापावेतो प्रतिवादीने स्वतः अगर अन्य इसमांमार्फत दावा मिळकतीधून कोणत्याही प्रकारचा रस्ता करु नये व वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अशी त्यांना तुर्तातुर्त ताकीद देणेत येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्वाक्षरी/–

दिनांक – २६/०३/२०१९

( श्रीमती. दुर्गा भ. सुतार )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव.